N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** सोनपेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0071 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/03/2026 03:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Date From (दिनांक पासून):** 06/03/2026

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/03/2026

**Time From (वेळेपासून):** 18:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/03/2026 **Time (वेळ):** 03:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/03/2026 03:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 25 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** निळा पाटी ता सोनपेठ ,सोनपेठ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** राहूल रामदास तरकसे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी,परभणी,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8411808328

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भगवान विठठल मुंढे | | | 1. पोलीस ठाणे सोनपेठ,परभणी, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी राहूल रामदास तरकसे, वय - 44 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी मो.नं. 8411808328

पोलीस ठाणे सोनपेठ येथे हजर येऊन सरकारतर्फे फिर्यादी होऊन फिर्याद देतो की, दि. 25/02/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असतांना आम्हास तक्रारदार व्यंकटी कराड रा. गंगाखेड यांचा फोन आला व त्यांनी आम्हास एक लोकसेवक लाच मागणी करत असल्याबाबत तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही तात्काळ दोन शासकीय पंच नामे 1) राचप्पा अशोकराव बिराजदार, वय 36 वर्ष, पद - लिपीक टंकलेखक, महानगरपालिका मालमत्ता कर विभाग परभणी, रा. खंडोबा बाजार परभणी ता. जि. परभणी 2) रंगनाथ सखारामजी गरुड, वय 53 वर्ष, पद - लिपीक, महानगरपालिका क्रिडा व संकीर्ण विभाग परभणी, रा. कृषी सारथी का ॅलनी परभणी, ता. जि. परभणी यांना उपलब्ध करून घेतले. त्यानंतर दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक असे शासकीय वाहनाने संपूर्ण किट साहित्यासह तक्रारदार यांनी कळविल्याप्रमाणे गंगाखेड परळी रोडवरील तक्रारदार यांचे गोशाळेवर 16.00 वाजता गेलो. तेथे दोन्ही पंच व सापळा पथकाची तक्रारदार यांचेसोबत ओळख करुन दिली.

त्यानंतर मुळ तक्रारदार व्यंकटी पाटलोबा कराड वय - 70 वर्ष, व्यवसाय - गोशाळा रा. ओमकार गंगाखेड ता. गंगाखेड, जि. परभणी यांनी पंचासमक्ष तोंडी तक्रार कथन केली की, " माझी मानकादेवी ता.गंगाखेड येथे श्री संत मुक्ताई नावाची गोशाळा आहे. सदर गोशाळेत 150 गाई आहेत. दिनांक 18/02/2026 रोजी भागवत पुंडलिक आंधळे व त्याच्यासोबत इतर पाच जण असे आमच्या मुक्ताई गोशाळेत आले. त्यांनी आमच्याकडे दिड वर्षापुर्वी एक गाय, दोन गोरे आणून सोडले होते. नियमाप्रमाणे गोशाळेतून परत नेता येत नाहीत. परंतु ते दि. 18/02/2026 रोजी गोशाळेत आले तेथे माझी मुलगी मुक्ता कराड होती व एक शेतगडी महादेव मुंडे तेथे होता आणि मी बाहेरगावी डोंगरपिंपळ्याला होतो. त्यावेळेस त्यांनी येऊन आमची गाय व दोन गोरे परत दया म्हणून माझ्या मुलीसोबत वाद केला तिला अश्लिल शिवीगाळ केली. माझी मुलगी वडील येईपर्यंत थांबा असे म्हणले असता ते न ऐकता गाय व दोन गोरे घेऊन गेले असे मुलीने मला मी परत आल्यावर सांगितले. घडलेल्या घटनेची तक्रार देण्यासाठी मी व मांझी मुलगी मुक्ता हिला सोबत घेऊन पोलीस स्टेशन सोनपेठ येथे गेलो. तेथे माझे मुलीचा अर्ज घेऊन बिट जमादार भगवान मुंडे यांच्याकडे देण्यात आला. दि. 20/02/2026 ला आमच्या गोशाळेजवळ येऊन त्यांनी मला माझे मुलीने दिलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी 10,000/- रुपयाची मागणी केली. मी त्यांना बोललो साहेब माझ्या मुलीला खुप वाईट वक्ट बोललेत ते त्यांच्यावर कार्यवाही करा ते बोललेत. त्यावर मी करतो कार्यवाही पण त्यासाठी मला तुम्ही 10,000/-रुपये दया असे बिट जमादार मुंडे मला म्हणाले होते.

मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नाही, म्हणुन मी तक्रार देत आहे. माझे त्यांच्याशी कोणतेही भांडण, तंटा, वाद अथवा दुष्मनी नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे देण्याघेण्याचे व्यवहार नाही. मला दिनांक 25/02/2026 रोजी जमादार मुंढे यांनी परळी रोडवर भेटण्यास बोलवले आहे. भेटी दरम्यान जमादार मुंढे यांनी अथवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी मला माझे कायदेशीर कामासाठी लाचेची मागणी केल्यास त्याचेवर कायदेशीर कार्यवाही करावी." वगैरे तक्रार सांगितल्याने त्याप्रमाणे त्यांची तक्रार आम्ही लॅपटा ॅवर टंकलिखीत केली व त्याची प्रिंटरवर प्रिंट काढून त्यावर तक्रारदार, पंच व आम्ही सही केली.

त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक मुंढे यांना फोन करुन भेटण्याबाबत विचारणा केली असता लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदार यांना सायंकाळी निळा पाटी परळी रोडला भेटण्यास सांगितले. त्यानूसार सायंकाळी तक्रारदार कराड यांनी लोकसेवक मुंढे यांना परत फोन केला असता लोकसेवकाने निळा पाटी परळी रोडला भेटण्यास बोलाविले. त्यावरुन निळा पाटी परळी रोडला लाचमागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर लाचमागणी पडताळणी पुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर 18.28 ते 19.21 वाजण्याच्या दरम्यान करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कार्यवाही वेळी तक्रारदार कराड व पंच क्र. 01 बिराजदार यांना आवश्यक

त्या सुचना देवुन व्हाईस रेकाॅर्डरसह लोकसेवक मुंढे यांची भेट घेण्यासाठी गंगाखेड - परळी रोडवरील निळा पाटी येथे पाठविण्यात आले.

लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गंगाखेड - परळी रोडवरील निळा पाटी येथे विश्वलक्ष्मी रसवंतीवर पंच क्र. 01 बिराजदार यांचेसमक्ष झालेल्या भेटीवेळी तक्रारदार व लोकसेवक मुंढे यांच्यात तक्रारदार यांचे अर्जामध्ये केलेल्या कार्यवाहीबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान तक्रारदार यांनी मला पेंडला कई तुमच्याकून ठून दयायचय मला आकडा सांगायचा असे म्हणल्यावर लोकसेवक मुंढे यांनी 'मी ठिक हय दोन हजाराची पेंड चारा आणिक काय पाहिजे... बाकीच देऊन टाका'... असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी 'किती देऊ' असे म्हणाले. त्यावर लोकसेवक मुंढे यांनी 'आता दोन म्हणल्यावर...दहातून दोन साहेबाला म्हणतो न पेंड घेऊन दिली बुआ' असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी 'दोन गेल्यावर किती हजार राहतेत' असे विचारले. लोकसेवक मुंढे यांनी सोळा हजार म्हणाले, त्यावर तक्रारदार यांनी ठिकय असे म्हणले. त्यानंतर लोकसेवक मुंढे यांनी हसून 'सोळा नाही दहा हजार म्हणलेल हय' असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी 'ठिकय' म्हणून होकार दिला. त्यानंतर पुन्हा लोकसेवक मुंढे यांनी 'दोन घ्या आठ हजार देऊन टाका' असे म्हणून तक्रारदार यांना पंच क्र. 01 बिराजदार यांचे समक्ष लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार कराड यांनी लोकसेवक मुंढे यांना सकाळी करुन टाकतो, उदया किंवा परवा करुन टाकतो म्हणाले. त्यानंतर लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदारास विक्रीसाठी निघालेले शेत दाखविण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक मुंढे व तक्रारदार पंचासह परळी रोडला शेत बघण्यासाठी गेले व तेथून तक्रारदार व पंच क्र. 01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले.

लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार कराड, लोकसेवक मुंढे यांचे संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरच्या सहाय्याने ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदार कराड यांचे मुलीने दिलेल्या अर्जावर गैरअर्जदार यांना पावबंद केले त्यामुळे बक्षीस म्हणुन तडजोडीअंती 8,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावरुन लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे. पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक मुंढे यांनी सदर लाच रक्कम ही त्यांनी त्यांचे साहेबासाठी मागत असल्याबाबत तक्रारदार यांना सांगितले. त्यावरुन सर्वानुमते दि. 26/02/2026 रोजी लोकसेवक मुंढे यांचे साहेब पोलीस ठाणे सोनपेठचे ठाणेदार गित्ते यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

दि.26/02/2026 रोजी तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पोलीस ठाणे सोनपेठचे ठाणेदार गित्ते यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर सह पोलीस ठाणे सोनपेठ येथे पाठविण्यात आले. परंतु पोलीस ठाणे सोनपेठचे ठाणेदार गित्ते यांनी तक्रारदार कराड यांना कोणत्याही प्रकारची लाच मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक मुंढे यांचेवर दि. 27/02/2026 रोजी सापळा कार्यवाही करण्याची विनंती केल्याने दि.27/02/2026 रोजी लोकसेवक मुंढे यांचेवर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दि. 27/02/2026 रोजी तक्रारदार यांची भेट न झाल्याने सापळा कार्यवाही स्थगित करुन दि. 02/03/2026 रोजी करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

दि. 02/03/2026 रोजी सापळा कार्यवाहीकामी आम्ही शासकीय पंच व सापळा पथकासह तक्रारदार यांचे गोशाळेवर हजर आलोत. तक्रारदार यांनी पंचासमक्ष लोकसेवक मुंढे यांना फोन केला असता त्यांनी गंगाखेड शहरातील परळी नाक्यावरील हाॅटेल गोविंदराज येथे भेटण्यासाठी बोलाविले. गंगाखेड शहरातील परळी नाक्यावरील गोविंदराज हाॅटेलवर करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीवेळी लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरुन सापळा कार्यवाही स्थगित करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांचे विनंतीवरुन दि. 05/03/2026 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दि. 05/03/2026 रोजी तक्रारदार यांची लोकसेवक मुंढे यांचेशी भेट न झाल्याने तक्रारदार यांचे विनंती वरुन सापळा कार्यवाही स्थगित करण्यात आली.

त्यानंतर तक्रारदाराच्या विनंती नूसार दि. 06/03/2026 रोजी लोकसेवकावर सापळा कार्यवाही करण्याकरिता तक्रारदार यांचे गोशाळा येथे आम्ही दोन्ही पंच व सापळा पथक हजर आलोत. तक्रारदार यांना लोकसेवकाने गंगाखेड - परळी रोडवरील निळा पाटी जवळील विश्वलक्ष्मी रसवंतीवर भेटण्यासाठी बोलाविले. त्यामुळे सापळापुर्व कार्यवाही दरम्यान तक्रारदार व पंच यांना अॅंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. सापळा कार्यवाही अनुशंगाने तक्रारदार, पंचांना व सापळा पथकास आम्ही सुचना दिल्या. दि. 02/03/2026 रोजी तक्रारदार यांनी जमा केलेल्या लाचेच्या 8,000/- रू. रक्कमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम तक्रारदार कराड यांच्याकडे देवून व्हाईस रेकाॅर्डरसह तक्रारदार कराड व पंच क्र. 01 बिराजदार यांना लोकसेवक मुंढे यांना लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांचे स्कुटीवर पाठविले.

त्यांचे पाठोपाठ सापळा पथक आवश्यक किट साहित्यासह शासकीय वाहन व खाजगी मोटारसायकलने निघाले. गंगाखेड - परळी रोडवरील निळा पाटी जवळील विश्वलक्ष्मी रसवंतीवर 18.32 ते 19.15 वाजण्याचे दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही वेळी तक्रारदार कराड व लोकसेवक मुंढे यांची समक्ष भेट झाली. भेटी दरम्यान लोकसेवक मुंढे यांनी पंच क्र. 01 बिराजदार यांचे समक्ष तक्रारदार कराड यांना तुम्ही काय करा एॅका...बाकीचे जे हय का देऊन टाका आता...असे म्हणाले. त्यावर तक्रारदार लोकसेवक मुंढे यास दयायलाच आलोय बाबा.. असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक मुंढे यांना घ्या मापून घ्या असे म्हणाले. त्यावर लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदारास किती हईत असे विचारले असता तक्रारदार यांनी आठ हईत कमी कस देईल तुम्हाला..वा रे वा घ्या मापा.. असे म्हणून लाच रक्कम 8,000/- रुपये लोकसेवक मुंढे यांना दिली. त्यावर लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदारास मापायच नाही असे म्हणून लाचरक्कम उजव्या हाताने स्विकारुन अंगावरील पॅटच्या समोरील उजव्या बाजूच्या खिशात ठेऊन दिली. त्यानंतर लोकसेवक यांनी लाच रक्कम स्विकारताच पंच क्र. 01 बिराजदार यांनी सापळा पथकास दिसेल अशा प्रकारे पुर्वनियोजीत इशारा केला. तो इशारा पाहून सापळा पथकातील सर्व स्टाफ तेथे आले. सदर वेळी पंच क्र. 01 यांनी आम्हास सांगितले की, लोकसेवक यांना संशय आल्याने त्यांनी त्यांचे अंगावरील पॅटच्या उजव्या बाजूच्या खिशात ठेवलेली लाचरक्कम काढून बाजूला फेकली आहे. तेंव्हा आमचे सुचनेवरुन पंच क्र. 01 यांनी लोकसेवकाने बाजूस जमीनीवर टाकलेली लाचरक्कम उचलून स्वतःजवळ घेतली.

त्यानंतर आम्ही लोकसेवकास स्वतःची ओळख सांगुन लोकसेवकास त्याचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्याने त्यांचे नाव भगवान विठ्ठल मुंढे, वय 54 वर्ष, पद - पोलीस हवालदार ब.नं. 554 नेमणूक पोलीस ठाणे सोनपेठ, रा. कोद्री रोड, गंगाखेड, जि. परभणी असे सांगितले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष लोकसेवकास लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लाचरक्कम स्विकारुन स्वतःच्या खिशात ठेवल्याचे व नंतर संशय आल्याने बाजूला फेकल्याचे मान्य केले. त्यानंतर लाच रक्कम 8,000/- रुपये नोटांवर व लोकसेवक मुंढे यांच्या दोन्ही हातावर अंधारात पंचासमक्ष अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता नोटांवर, लोकसेवकाचे अंगावरील पॅन्टचे उजव्या बाजूचे समोरील खिशावर व लोकसेवक मुंढे यांचे उजव्या हातांच्या बोटांवर हिरवट रंगाची चकाकी स्पष्ट दिसून आली. त्यानंतर दोन्ही पंचांनी नोटांचे नंबरची पडताळणी केली असता ती लाचेची रक्कम असल्याची खात्री झाली आहे. सदरची लाच रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार कराड आणि लोकसेवक मुंढे यांचे दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरव्दारे ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे. त्यानंतर लोकसेवक मुंढे यांचेसह सापळा पथक शासकीय वाहनाने पोलीस ठाणे सोनपेठ येथे आलोत. पोलीस ठाणे येथे ध्वनिमुद्रीत संभाषण असलेले मेमरीकार्ड पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहे. तसेच लोकसेवक मुंढे यांचे अंगावरील पॅन्ट जप्त करण्यात आली आहे. सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला.
दि. 25/02/2026 रोजी तक्रारदार कराड यांनी दिलेल्या तक्रारीवरून पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदार कराड यांची मुलगी मुक्ता हिने दिलेल्या अर्जावर लोकसेवक मुंढे यांनी गैरअर्जदारांना पावबंद केले म्हणून बक्षीस स्वरुपात तक्रारदारास 8,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर दि. 06/03/2026 रोजी 18.32 ते 19.15 वाजेदरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही वेळी गंगाखेड - परळी रोडवरील निळा पाटी येथील विश्वलक्ष्मी रसवंतीगृह येथे लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदाराकडुन पंचासमक्ष 8,000/- रूपये लाचेची रक्कम स्वतः स्विकारली आहे. म्हणून आमची लोकसेवक भगवान विठ्ठल मुंढे, वय 54 वर्ष, पद - पोलीस हवालदार ब.नं. 554 नेमणूक पोलीस ठाणे सोनपेठ, रा. कोद्री रोड, गंगाखेड, जि. परभणी यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे."

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ashok Raosaheb Gite(I (Inspector)) / PI

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकारी)

पोलीस हवालदार
पोलीस ठाणे ...

**Name** (नाव): Ashok Raosaheb Git

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

PSI BHUSHAN Kamble